लोकमत

SMBT

# ‘एसएमबीटी’त घडताहेत संशोधक

## ८० विद्यार्थ्यांना आयसीएमआर, एसटीआरजी शिष्यवृत्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

संगमनेर : एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज, संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अॅण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेची ‘आयसीएमआर’ची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी ‘एसटीआरजी’ शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे.

**३२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.**

या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनाचा टक्का वाढेल आणि नवनवीन संशोधने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातून येणाऱ्या काळात घडतील, असा विश्वास अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर आणि डेंटलचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा, जास्तीत जास्त विद्यार्थी संशोधनाकडे वळावेत, तसेच त्यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा सामाजिक कार्यासाठी व्हावा, या उद्देशाने दरवर्षी आरोग्य संशोधन विभाग, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद व आरोग्य विज्ञान विद्यापीठ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवत असते. संशोधन किंवा इनोव्हेशन यामध्ये आवड असलेले विद्यार्थी याठिकाणी अर्ज करतात. यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून तब्बल ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे.

## ६०० हून अधिक संशोधन प्रकल्प

८० प्रकल्पांना अनुदान मिळाले असून, एसएमबीटीच्या अंतर्गत काही प्रकल्पांचे काम सध्या सुरू आहे. वेगवेगळ्या स्तरावर संशोधन सुरू असून, तब्बल ६००हून अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध प्रकाशित करण्यात येणार असल्याचे संशोधन समन्वयक डॉ. अभिजीत तांबे यांनी सांगितले.

Hello Ahmednagar
Page No. 3 Apr 05, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

SMBT



एसएमबीटी सेवाभावी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांच्या समवेत मान्यवर व विद्यार्थी.

# एसएमबीटीमधील ८० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

## ६०० शोधनिबंधांसह संशोधन प्रकल्प होणार प्रकाशित

**नाशिक :** एसएमबीटी मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस ॲण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग (DHR) व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. याचबरोबर आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनाचा टक्का वाढेल आणि नवनवीन संशोधने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातून येणाऱ्या काळात घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून ८० विद्यार्थ्यांची निवड होवून पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. यात विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन हे सामाजिक, आरोग्य तसेच वेगवेगळ्या आरोग्यविषयकबाबींमध्ये उपयोगी होईल यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. देशभरातील विद्यार्थ्यांनी पाठवलेल्या अर्जांचे आयसीएमआरची एक समिती मूल्यमापन करून निवड जाहीर करत असते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसह खासगी संस्थादेखील विद्यार्थ्यांची नावे व त्यांचे प्रकल्प या शिष्यवृत्तीसाठी पाठवते. त्यामुळे एवढ्या स्पर्धेत देखील एसएमबीटीच्या वेगवेगळ्या महाविद्यालयांचे ८० विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्यामुळे मानाचा तुरा खोवण्यात यश आले आहे. याठिकाणी वेगवेगळ्या स्तरावर संशोधन सुरू असून, ६०० हून अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध प्रकाशित करण्याकडे वाटचाल सुरू असल्याचे संशोधन समन्वयक डॉ अभिजित तांबे यांनी सांगितले. (वा.प्र.)

Nashik Main
Page No. 4 Apr 05, 2025
Powered by: erelego.com

SMBT

LOKMAT TIMES

LOKMAT TIMES ● **Anchor**

# 80 students receive ICMR, STRG scholarships

## 600 Research Papers to be published

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, APR 6

A total of 32 students from SMBT Medical Sciences and Research Centre, SMBT Dental College Sangamner, SMBT Institute of Medical Sciences and Research Centre, and SMBT Institute of Dental Sciences and Research have received scholarships from the Department of Health Research (DHR) and the Indian Council of Medical Research (ICMR). Additionally, 48 students have received the STRG (Short Term Research Grant) scholarship awarded by the Maharashtra University of Health Sciences (MUHS).

Dean Dr Meenal Mohgaonkar and Principal of the Dental College, Dr Ashok Patil, shared this information. They expressed confidence that these scholarships would increase the percentage of students engaging in research, anticipate the emergence of new research initiatives from medical students in the near future, and appreciated the students' success.

Every year, the Department of Health Research (DHR), ICMR, and the University of Health Sciences invite applications from medical students interested in research and innovation. This year, applications were submitted from five colleges under SMBT. From these, a total of 80 students were selected for research scholarships. These students will receive scholarships over the next three years. Their research is important as it contributes to public health and various health-related fields.

A committee from ICMR evaluates applications received nationwide and subsequently announces the selected students. This opportunity also enables students to represent their research at a national level.



Students who received ICMR scholarships seen with Managing Trustee Dr Harshal Tambe, Principal Dr Ashok Patil, Dean Dr Meenal Mohgaonkar, Dr Kiran Jagtap, Dr Dhanaji Jadhav and others.

Students and teachers from various colleges within the SMBT educational complex are exploring diverse opportunities. Eighty projects have received funding, and several initiatives under SMBT's internal programs are ongoing. Research is being conducted at multiple levels, and over 600 research projects and papers are progressing toward publication, according to Research Coordinator Dr Abhijit Tambe.

> Every student at SMBT strives to excel in one area or another. Through scholarships, students receive financial aid, which opens up additional avenues in research. There are abundant opportunities in the field of research, and students should view it as a viable career option.
>
> \- **Dr Ashok Patil**, Principal, SMBT Dental College and Hospital, Sangamner

# ‘एसएमबीटी’त घडताहेत नवसंशोधक

## ऐंशी विद्यार्थ्यांना आयसीएमआर, एसटीआरजी शिष्यवृत्ती प्रदान

**लोकनामा प्रतिनिधी**



**नाशिक :** एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज, संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. याबाबतची माहिती अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा, जास्तीत जास्त विद्यार्थी संशोधनाकडे वळावेत तसेच त्यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा सामाजिक कार्यासाठी व्हावा या उद्देशाने दरवर्षी आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, आरोग्य विज्ञान विद्यापीठात वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवत असते. संशोधन किंवा इनोव्हेशन यांमध्ये आवड असलेले विद्यार्थी याठिकाणी अर्ज करतात. यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून तब्बल ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. यात विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन सामाजिक आरोग्य तसेच वेगवेगळ्या आरोग्यविषयक बाबींत उपयोगी होईल, यासाठी महत्त्वाचे आहे.

> एसएमबीटीतील महाविद्यालयांत चांगली संशोधन संस्कृती रुजविण्यात यश आले आहे. अनेक विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले आहेत. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारे अर्थसहाय्यामुळे संशोधनाच्या वाटा खुल्या झाल्या आहेत. संशोधन क्षेत्रात खूप वाव असून, विद्यार्थ्यांनी याकडे करिअर म्हणून पाहावे.
>
> **-डॉ. अशोक पाटील,**
>
> प्राचार्य, एसएमबीटी डेंटल कॉलेज हॉस्पिटल, संगमनेर

विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन सामाजिक आरोग्य जपण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात बळकटी आणण्यासाठी उपयोगात घेतले जाते. मुख्यत्वे या संशोधनाचा उपयोग निरोगी समाज घडविण्याच्या दृष्टिकोनातून केला जातो. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातीलच शिक्षक मार्गदर्शक म्हणून लाभत असल्यामुळे विद्यार्थी शिक्षक संवाददेखील यामुळे दृढ होणार असून, शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात रुची वाढेल, असेही बोलले जात आहे.

**सहाशेपेक्षा अधिक संशोधन प्रकल्पांचे प्रकाशन**

एसएमबीटी शैक्षणिक संकुलमधील ८० प्रकल्पांना अनुदान मिळाले असून, एसएमबीटीअंतर्गत काही प्रकल्पांवर काम सध्या सुरू आहे. वेगवेगळ्या स्तरावर संशोधन सुरू असून, तब्बल ६०० हून अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध प्रकाशित करण्याकडे वाटचाल सुरू असल्याचे संशोधन समन्वयक डॉ. अभिजित तांबे यांनी सांगितले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

**पुढारी**

स्थापना १९३९

www.pudhari.com



नाशिक : शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांसमवेत व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे, प्राचार्य डॉ. अशोक पाटील, अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, डॉ. किरण जगताप, उपअधिष्ठाता डॉ. धनाजी जाधव आदी.

# 'एसएमबीटी'च्या ८० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

एसएमबीटी मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, डेंटल कॉलेज आणि इतर संस्थांमधील एकूण ८० विद्यार्थ्यांना आयसीएमआर (ICMR) आणि एसटीआरजी (STRG) शिष्यवृत्ती मिळाली आहे. यामुळे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन मिळणार असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर आणि डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

संशोधन संस्कृती वाढावी आणि आरोग्यविषयक नवनवीन संकल्पना विकसित व्हाव्यात, या उद्देशाने आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद दरवर्षी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवते.

यंदा एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांमधून अर्ज पाठवण्यात आले होते, त्यातून ८० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आर्थिक मदत मिळेल. यावर्षी ६०० हून अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध प्रकाशित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे संशोधन समन्वयक डॉ. अभिजित तांबे यांनी सांगितले. संशोधन क्षेत्रात मोठ्या संधी असून, विद्यार्थ्यांनी याकडे करिअर म्हणून पाहावे, असे आवाहन डॉ. अशोक पाटील यांनी केले.

My Nashik Edition
Apr 03, 2025 Page No. 04

दिव्य मराठी

नाशिक सिटी 04-04-2025

SMBT

# वैद्यकीय संशोधन परिषद, एसटीआरजी शिष्यवृत्तीतून ६०० संशोधन प्रकल्प

## एसएमबीटीच्या पाच कॉलेजांतून अर्ज, 3 वर्षांसाठी शिष्यवृत्ती

**प्रतिनिधी** | नाशिक

एसएमबीटी मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस ॲण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ अशी एकूण ८० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. यातून ६०० पेक्षा अधिक संशोधने सादर होणार आहेत.

वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा या उद्देशाने दरवर्षी आरोग्य संशोधन विभाग, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून संशोधनाचे काम करण्यासाठी अर्ज मागवत असते. यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांतील अर्ज

### ८० प्रकल्पांना अनुदान, संशोधन प्रकल्प प्रकाशित होणार

एसएमबीटी शैक्षणिक संकुलमधील सध्या ८० प्रकल्पांना अनुदान मिळाले असून काही प्रकल्पांचे काम सध्या सुरू आहे. वेगवेगळ्या स्तरावर संशोधन सुरू असून तब्बल ६०० पेक्षा अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध लवकरच प्रकाशित होतील, असे संशोधन समन्वयक डॉ. अभिजित तांबे यांनी सांगितले.

निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षे ही शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. देशभरातून सरकारी, खासगी संस्थांद्वारेही या स्पर्धेत सहभाग घेतला जातो. त्यात एसएमबीटी महाविद्यालयांचे ८० विद्यार्थ्यांनी यश मिळविले. अशी माहिती अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली. दरम्यान, या ८० निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी अभिनंदन

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# ‘एसएमबीटी’त घडत आहेत संशोधक

## ८० विद्यार्थ्यांना आयसीएमआर, एसटीआरजी शिष्यवृत्ती

**नाशिक ।** एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ डेंटल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. याबाबतची माहिती अधिष्ठाता डॉ मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनाचा टक्का वाढेल आणि नवनवीन संशोधने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातून येणाऱ्या काळात घडतील असा विश्वास त्यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा, जास्तीत जास्त




विद्यार्थी संशोधनाकडे वळावेत तसेच त्यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा सामाजिक कार्यासाठी व्हावा या उद्देशाने दरवर्षी आरोग्य संशोधन विभाग भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद व आरोग्य विज्ञान विद्यापीठ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवत असते.

संशोधन किंवा इनोव्हेशन यामध्ये आवड असलेले विद्यार्थी याठिकाणी अर्ज करतात. यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून तब्बल ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे.

यात विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन सामाजिक आरोग्य तसेच वेगवेगळ्या आरोग्य विषयक बाबीत उपयोगी होईल यासाठी महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना यानिमित्ताने राष्ट्रीय पातळीवर संधोधन करण्यासाठीचे प्रतिनिधित्व करता येते. तसेच वैद्यकीय महाविद्यालय स्तरावर शिक्षण घेत असताना संशोधन संस्कृती रुजवता येते व याचा फायदा या विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातदेखील करता येतो यामुळे बहुतांश विद्यार्थ्यांचा कल याकडे वाढलेला दिसून येत आहे.

> एसएमबीटीतील प्रत्येक विद्यार्थी कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात आपली उल्लेखनीय कामगिरी करू पाहत आहे. याठिकाणी सर्वच महाविद्यालयात चांगली संशोधन संस्कृती रुजविण्यात यश आले आहे. अनेक विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले आहेत. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारे अर्थसहाय्य यामुळे संशोधनाच्या वाटा खुल्या झाल्या आहेत. संशोधन क्षेत्रात वाव असून, विद्यार्थ्यांनी याकडे करीअर म्हणून पहावे.
>
> **–डॉ. अशोक पाटील,** प्राचार्य, एसएमबीटी डेंटल कॉलेज हॉस्पिटल, संगमनेर



MBT

पुण्य नगरी

# 'एसएमबीटी'तील ८० विद्यार्थ्यांना संशोधनासाठी शिष्यवृत्ती

**नाशिक :** 'एसएमबीटी'त शिक्षण घेणाऱ्या ८० विद्यार्थ्यांना संशोधन कार्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली आहे. एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अॅण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेची आयसीएमआरची शिष्यवृत्ती, तर आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे, अशी माहिती अधिष्ठाता




डॉ. मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा, यास्तव आरोग्य संशोधन विभाग (ऊळफ) भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (कळटफ) व आरोग्य विज्ञान विद्यापीठ विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवत असते. संशोधन किंवा इनोव्हेशन यामध्ये आवड असलेले विद्यार्थी याठिकाणी अर्ज करतात.

एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून तब्बल ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. यात विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन सामाजिक आरोग्य तसेच वेगवेगळ्या आरोग्य विषयक बाबीत उपयोगी होईल, यासाठी महत्त्वाचे आहे. शिष्यवृत्तीसाठी देशभरातून स्पर्धा असते. त्यात 'एसएमबीटी'च्या वेगवेगळ्या महाविद्यालयांचे ८० विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्याने हा एसएमबीटीसाठी मानाचा तुरा ठरला आहे.

## संशोधन प्रकल्प प्रकाशित होणार

'एसएमबीटी' शैक्षणिक संकुलात वेगवेगळ्या स्तरावर संशोधन सुरू असून, तब्बल ६०० हून अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध प्रकाशित करण्याकडे वाटचाल सुरू असल्याचे संशोधन समन्वयक डॉ. अभिजित तांबे यांनी सांगितले.

एसएमबीटीतील अनेक विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले आहेत. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अर्थसहाय्यामुळे संशोधनाच्या वाटा खुल्या झाल्या आहेत. संशोधन क्षेत्रात खूप वाव असून, विद्यार्थ्यांनी याकडे करीयर म्हणून पहावे.

– **डॉ. अशोक पाटील,** प्राचार्य, एसएमबीटी डेंटल कॉलेज हॉस्पिटल, संगमनेर

Nashik Edition
Apr 03, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
03 Apr 2025 - Page 7

SMBT

# ‘एसएमबीटी’च्या ऐंशी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**नाशिक ।** एसएमबीटी मेडिकल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ डेंटल सायन्सेस अ‍ॅण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे.

याबाबत अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी माहिती दिली. शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनाचा टक्का वाढेल आणि नवनवीन संशोधने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातून येणाऱ्या काळात घडतील असा विश्वास त्यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन सामाजिक आरोग्य जपण्यासाठी विविध क्षेत्रात बळकटी आणण्यासाठी केले जाते. याचा उपयोग निरोगी समाज घडविण्याच्या दृष्टिकोनातून केला जातो. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातीलच शिक्षक मार्गदर्शक म्हणून लाभतात. विद्यार्थ्यांना यानिमित्ताने राष्ट्रीय पातळीवर संशोधन करण्यासाठी प्रतिनिधित्व करता येते.




> एसएमबीटीतील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले आहेत. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारे अर्थसहाय्यामुळे संशोधनाच्या वाटा खुल्या झाल्या आहेत. संशोधन क्षेत्रात खूप वाव असून विद्यार्थ्यांनी याकडे करीयर म्हणून पाहावे.
>
> **-डॉ. अशोक पाटील**

नवराष्ट्र
www.navarashtra.com

SMBT

# एसएमबीटी रिसर्च सेंटरमध्ये घडताहेत संशोधक

## ८० विद्यार्थ्यांना आयसीएमआर, एसटीआरजी शिष्यवृत्ती ; ६०० शोधनिबंधांसह संशोधन प्रकल्प होणार प्रकाशित



**नाशिक,** (वा.) एसएमबीटी मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ डेंटल सायन्सेस ॲण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. याबाबतची माहिती अधिष्ठाता डॉ मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनाचा टक्का वाढेल आणि नवनवीन संशोधने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातून येणाऱ्या काळात घडतील असा विश्वास त्यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा, जास्तीत जास्त विद्यार्थी संशोधनाकडे वळावेत तसेच त्यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा सामाजिक कार्यासाठी व्हावा या उद्देशाने दरवर्षी आरोग्य संशोधन विभाग (DHR) भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) व आरोग्य विज्ञान विद्यापीठ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवत असते. संशोधन किंवा इनोव्हेशन यामध्ये आवड असलेले विद्यार्थी याठिकाणी अर्ज करतात.

यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून तब्बल ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली.

Nashik Edition
Apr 04, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

# ‘एसएमबीटी’त घडत आहेत संशोधक

## ८० विद्यार्थ्यांना आयसीएमआर व एसटीआरजी शिष्यवृत्ती

SMBT

**नाशिक : प्रतिनिधी**

एसएमबीटी मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस ॲण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. याबाबतची माहिती अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा, जास्तीत जास्त विद्यार्थी संशोधनाकडे वळावेत तसेच त्यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा सामाजिक कार्यासाठी व्हावा, या उद्देशाने दरवर्षी आरोग्य संशोधन विभाग भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद व आरोग्य विज्ञान विद्यापीठ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवत असते. संशोधन किंवा इनोव्हेशन यामध्ये आवड असलेले विद्यार्थी या ठिकाणी अर्ज करतात. यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून तब्बल ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. देशभरातील विद्यार्थ्यांनी पाठिलेल्या अर्जावर आयसीएमआरची एक समिती अर्जांचे मूल्यमापन करून निवड जाहीर करत असते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसह खासगी संस्थादेखील विद्यार्थ्यांची नावे व त्यांचे प्रकल्प या शिष्यवृत्तीसाठी पाठवते. त्यामुळे एवढ्या स्पर्धेतदेखील एसएमबीटीच्या वेगवेगळ्या महाविद्यालयांचे ८० विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्यामुळे मानाचा तुरा खोवण्यात यश आले आहे.

### ६०० पेक्षा अधिक संशोधन प्रकल्प प्रकाशित होणार

एसएमबीटी शैक्षणिक संकुलमधील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याकडून वेगवेगळ्या संधी गवसल्या जात आहेत. सध्या ८० प्रकल्पांना अनुदान मिळाले असून, एसएमबीटीच्या अंतर्गत काही प्रकल्पांचे काम सध्या सुरू आहे. वेगवेगळ्या स्तरावर संशोधन सुरू असून, तब्बल ६०० हून अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध प्रकाशित करण्याकडे वाटचाल सुरू असल्याचे संशोधन समन्वयक डॉ. अभिजित तांबे यांनी सांगितले.



**एसएमबीटी सेवाभावी संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. हर्षल तांबे यांच्यासमवेत प्राचार्य डॉ. अशोक पाटील, अधिष्ठाता डॉ. मीनल मोहगावकर, डॉ. किरण जगताप, उपअधिष्ठाता डॉ. धनाजी जाधव यांच्यासह आयसीएमआर रिसर्च गाइड्स आणि आयसीएमआर शिष्यवृत्तीप्राप्त झालेले व संशोधन करणारे विद्यार्थी.**

लक्ष महाराष्ट्र
गुरुवार
दि. ०३ एप्रिल २०२५
३

# एसएमबीटीत घडत आहेत संशोधक; ८० विद्यार्थ्यांना आयसीएमआर, एसटीआरजी शिष्यवृत्ती



**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

एसएमबीटी मेडिकल सायन्सेस एण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ डेंटल सायन्सेस एण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. तसेच आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. याबाबतची माहिती अधिष्ठाता डॉ मीनल मोहगावकर आणि डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनाचा टक्का वाढेल आणि नवनवीन संशोधने वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातून येणाऱ्या काळात घडतील असा विश्वास त्यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. अधिक माहिती अशी की, वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील संशोधनातील टक्का वाढावा, जास्तीत-जास्त विद्यार्थी संशोधनाकडे वळावेत तसेच त्यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा सामाजिक कार्यासाठी व्हावा या उद्देशाने दरवर्षी आरोग्य संशोधन विभाग भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद व आरोग्य विज्ञान विद्यापीठ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवत असते. संशोधन किंवा इनोव्हेशन यामध्ये आवड असलेले विद्यार्थी याठिकाणी अर्ज करतात.

यावर्षी एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांच्या माध्यमातून अर्ज पाठविण्यात आले होते. त्यातून तब्बल ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षांत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. यात विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन सामाजिक आरोग्य तसेच वेगवेगळ्या आरोग्य विषयक बाबीत उपयोगी होईल यासाठी महत्त्वाचे आहे.



नाशिक : शिष्यवृत्तीप्राप्त एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अँन्ड रिसर्चच्या विद्यार्थ्यांसमवेत एसएमबीटी संस्थेचे अधिकारी, प्राचार्य.

# ‘एसएमबीटी’च्या ८० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

## एसटीआरजी, आयसीएमआरसाठी ६00 शोधनिबंध होणार सादर

■ **सकाळ वृत्तसेवा**

नाशिक,ता. २ : एसएमबीटी मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी डेंटल कॉलेज संगमनेर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च सेंटर, एसएमबीटी इन्स्टिट्युट ऑफ डेंटल सायन्सेस ॲण्ड रिसर्च येथील एकूण ३२ विद्यार्थ्यांना आरोग्य संशोधन विभाग भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, आयसीएमआरची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून देण्यात येणारी एसटीआरजी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. अशी माहिती अधिष्ठाता डॉ मीनल मोहगावकर, डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांनी दिली.

एसएमबीटीच्या पाच महाविद्यालयांतून ८० विद्यार्थ्यांची निवड या संशोधन शिष्यवृत्तीसाठी झाली. विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन मिळत असल्यामुळे विद्यार्थी शिक्षक संवाद दृढ झाला आहे. देशातील शासकीय तसेच खासगी संस्थादेखील या स्पर्धेत असतात. एवढ्या स्पर्धेत महाविद्यालयांचे ८० विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्याने संस्थेच्या यशात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

> “ एसएमबीटीतील प्रत्येक विद्यार्थी कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात आपली उल्लेखनीय कामगिरी करू पाहत आहे. याठिकाणी सर्वच महाविद्यालयात चांगली संशोधन संस्कृती रुजविण्यात यश आले आहे. शिष्यवृत्तीतून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अर्थसहाय्यामुळे संशोधनाच्या वाटा खुल्या झाल्या आहेत. संशोधन क्षेत्रात खूप वाव असून विद्यार्थ्यांनी याकडे करीयर म्हणून पाहावे.
> **डॉ. अशोक पाटील**, प्राचार्य,
> एसएमबीटी डेंटल कॉलेज हॉस्पिटल संगमनेर

### ६०० संशोधन प्रकल्प

एसएमबीटी शैक्षणिक संकुलच्या सध्या ८० प्रकल्पांना अनुदान मिळाले आहे. वेगवेगळ्या स्तरावर संशोधन सुरु असून तब्बल ६०० हून अधिक संशोधन प्रकल्प आणि शोधनिबंध प्रकाशित करण्याकडे वाटचाल सुरु असल्याचे संशोधन समन्वयक डॉ अभिजित तांबे यांनी सांगितले.